# राज्यसेवा मुख्य परीक्षा

## घटकनिहाय

## प्रश्नपत्रिका विश्लेषण

## २०१२–२०१८

## GS : पेपर : ३

PRITHVI®
Publication

**राज्यसेवा मुख्य परीक्षा**

**घटकनिहाय प्रश्नपत्रिका विश्लेषण**

**२०१२-२०१८**

**GS : पेपर : ३**

**© पृथ्वी पब्लिकेशन**

**आवृत्ती**

एप्रिल २०१९

**प्रकाशक**

'पृथ्वी पब्लिकेशन', १५३६,

सदाशिव पेठ, पुणे. ४११०३०

फोन : ०२० - २४४५१९८६

**मुखपृष्ठ मांडणी**

नंदकिशोर धपाटे

**मांडणी**

रूपाली तांबे

अपूर्वा शिंदे

कोमल शेडगे

**मुद्रितशोधन**

प्रज्ञा भोसले

**वितरण व्यवस्था**

मो. नं. : ८३९०५५४१६१

**अभिप्राय, सूचना व मागणीसाठी संपर्क**

मो. नं. : ८३९०५५४१६१

publication@prithvi.net.in

**मूल्य : ₹ ३००/-**

PRITHVI®

Publication

या पुस्तकातील मजकुराचे कायदेशीर हक्क कॉपीराईट कायद्यानुसार प्रकाशकाकडे आहेत. या मजकुराचे कोणत्याही स्वरूपात पुनर्मुद्रण करण्यासाठी प्रकाशकाची परवानगी आवश्यक आहे. सदर बाबीचे उल्लंघन झाल्यास कॉपीराईट कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

या पुस्तकातील मजकूर व माहिती विविध स्त्रोतांमधून घेण्यात आली आहे. हा मजकूर व माहिती जास्तीत जास्त अचूक ठेवण्याचा प्रयत्न प्रकाशकाने केला आहे. तरीदेखील त्यामध्ये कालसापेक्ष व स्थलसापेक्ष बदल होऊ शकतात. या पुस्तकातील मजकूर व माहिती यामुळे होणाऱ्या नुकसानीस प्रकाशक जबाबदार राहणार नाहीत.

# अनुक्रमणिका

## १. मानव संसाधन विकास


| | | |
|---|---|---|
| १.१ | **भारतातील मानव संसाधन विकास** : भारतातील लोकसंख्येची सद्य:स्थिती - संख्यात्मक स्वरूप (अकारमान आणि वाढ - लिंग, वय, नागरी आणि ग्रामीण) आणि गुणात्मक स्वरूप (शिक्षण व आरोग्य विषयक काळजी), लोकसंख्याविषयक धोरण आणि २०५० पर्यंतच्या योजना, आधुनिक समाजातील मानव संसाधन नियोजनाचे महत्त्व आणि गरज, मानव संसाधन नियोजनामध्ये अंतर्भूत असलेले घटक आणि कारणीभूत गोष्टी, भारतातील बेरोजगाराचे स्वरूप, प्रकार आणि समस्या, भारतातील सेवायोजनाचा कल, विभिन्न विभागांतील व क्षेत्रातील कुशल कामगारांचे मागणी दर, मनुष्यबळ विकासाकरिता कार्यरत असलेल्या शासकीय आणि स्वयंसेवी संघटना उदाः एनसीईआरटी, एनआयईपीए, विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी), मुक्त विद्यापीठे, एआयसीटीई, एनसीटीई, आयटीआय, एनसीव्हीटी, आयएमसी इत्यादी, मानव संसाधन विकासाशी संबंधित समस्या आणि बाबी, शासनाचे नोकरीविषयक धोरण, बेरोजगारी आणि न्यून बेरोजगारी कमी करण्यासाठी विविध योजना. | ९ |
| १.२ | **शिक्षण** : मानव संसाधन विकासाचे आणि सामाजिक बदलाचे साधन म्हणून शिक्षणाचा विचार, भारतातील (पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षण) शिक्षण प्रणाली (शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, शिक्षणाचे व्यवसायिकीकरण, दर्जावाढ, गळतीचे प्रमाण इत्यादी) समस्या आणि प्रश्न, मुलींकरीता शिक्षण, सामाजिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या गरीब वर्ग, अधू, अल्पसंख्य, कौशल्य शोध इत्यादी, शासनाची शैक्षणिक धोरणे, योजना व कार्यक्रम, अनौपचारिक, औपचारिक आणि प्रौढ शिक्षणाचा प्रसार विनिमयन आणि सनियंत्रण करणाऱ्या शासकीय व स्वयंसेवी संस्था, ई- अध्ययन, जागतिकीकरण आणि खासगीकरण याचा भारतीय शिक्षणावरील परिणाम, राष्ट्रीय ज्ञान आयोग, राष्ट्रीय उच्च शिक्षण व संशोधन आयोग, आयआयटी, आयआयएम, एनआयटी. | ६३ |
| १.३ | **व्यावसायिक शिक्षण** : मानव संसाधन विकासाचे साधन म्हणून व्यावसायिक शिक्षणाचा विचार, व्यावसायिक/तंत्र शिक्षण - भारतातील, विशेषतः महाराष्ट्रातील सद्य:स्थिती, शिक्षणप्रणाली व प्रशिक्षण, शासकीय धोरणे, योजना व कार्यक्रम - समस्या, प्रश्न व त्यावर मात करण्यासाठी प्रयत्न, व्यावसायिक आणि तंत्र शिक्षणाचा प्रसार, विनिमयन करणाऱ्या आणि अधिस्वीकृती देणाऱ्या संस्था. | १२८ |
| १.४ | **आरोग्य** : मानव संसाधन विकासाचा अत्यावश्यक आणि प्रमुख घटक म्हणून आरोग्याचा विचार, जीवनविषयक आकडेवारी, जागतिक आरोग्य संघटना - उद्देश, रचना, कार्य व कार्यक्रम, भारतामध्ये | १४१ |

| | | |
|---|---|---|
| | शासनाची आरोग्यविषयक धोरणे, योजना आणि कार्यक्रम, आरोग्य विषयक काळजी घेणारी यंत्रणा, आरोग्याशी संबंधित समस्या आणि त्यावर मात करण्यासाठी करावयाचे प्रयत्न, जननी- बाल सुरक्षा योजना, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान. | |
| १.५ | **ग्रामीण विकास** : पंचायत राज व्यवस्थेला अधिकार प्रदान करणे, ग्रामपंचायत आणि ग्रामविकासातील तिची भूमिका, जमीन सुधारणा व विकास, ग्रामविकासातील सहकारी संस्थांची भूमिका, ग्रामविकासामध्ये अंतर्भूत असणाऱ्या वित्तीय संस्था, ग्रामीण रोजगार योजना, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता कार्यक्रम, ग्रामीण क्षेत्रातील पायाभूत विकास उदा. ऊर्जा, परिवहन, गृहनिर्माण व दळणवळण, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना. | १७२ |
| | **२. मानवी हक्क** | |
| २.१ | **जागतिक मानवी हक्क प्रतिज्ञापत्र (युडीएचआर १९४८)** : मानवी हक्काची आंतरराष्ट्रीय मानके, त्याचे भारताच्या संविधानातील प्रतिबिंब, भारतात मानवी हक्क राबविण्याची आणि त्याचे संरक्षण करण्याची यंत्रणा, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कांपासून वंचित असलेल्यांच्या समस्या जसे गरिबी, निरक्षरता, बेरोजगारी, सामाजिक - सांस्कृतिक - धार्मिक प्रथा, हिंसा, भ्रष्टाचार, दहशतवाद, कामगारांचे शोषण, हवालतीतील गुन्हेगारी इत्यादी. लोकशाही चौकटीत मानवी हक्क आणि मानवी सभ्यतेच पालन करण्यासाठी प्रशिक्षण देण्याची गरज. जागतिकीकरण आणि त्याचा विभिन्न क्षेत्रांवरील परिणाम, मानवी विकास निर्देशांक, बालमृत्यू प्रमाण, लिंग गुणोत्तर. | २०० |
| २.२ | **बाल विकास** : समस्या व प्रश्न (अर्भक मृत्युसंख्या, कुपोषण, बाल कामगार, मुलांचे शिक्षण इत्यादी) - शासकीय धोरणे, कल्याण योजना आणि कार्यक्रम - आंतरराष्ट्रीय अभिकरणे, स्वयंसेवी संघटना, सामूहिक साधने यांची भूमिका, लोककल्याणामध्ये लोकांचा सहभाग. | २३२ |
| २.३ | **महिला विकास** : समस्या व प्रश्न (स्त्री - पुरुष असमानता, महिलांविरोधी हिंसाचार, स्त्री अर्भक हत्या/स्त्रीभ्रूण हत्या, महिलांचे सबलीकरण इत्यादी) - शासकीय धोरण, विकास/कल्याण व सबलीकरण यासाठीच्या योजना व कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका आणि सामूहिक साधने, लोकविकासामध्ये लोकांचा सहभाग, आशा. | २५१ |
| २.४ | **युवकांचा विकास** : समस्या व प्रश्न (बेरोजगारी, असंतोष, अंमली पदार्थांचे व्यसन इत्यादी) - शासकीय धोरण- विकास योजना व कार्यक्रम - आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका आणि सामूहिक साधने, लोकविकासातील लोकांचा सहभाग | २७४ |
| २.५ | **आदिवासी विकास** : समस्या व प्रश्न (कुपोषण, अलिप्तता, एकात्मीकरण व विकास इत्यादी) - आदिवासी चळवळ - शासकीय धोरण, कल्याण योजना व कार्यक्रम - आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना व सामूहिक साधने यांची भूमिका, लोककल्याणामध्ये लोकांचा सहभाग | २८८ |

| | | |
|---|---|---|
| २.६ | **सामाजिकदृष्ट्या वंचित वर्गाचा विकास (अ.जा., अ.ज, वि.जा/भ.ज, इतर मागासवर्ग इत्यादी)**: समस्या व प्रश्न (संधीतील असमानता इत्यादी) – शासकीय धोरण, कल्याण योजना व कार्यक्रम – आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना व साधन संपत्ती संघटित करून कामी लावणे व सामूहिक सहभाग. | ३०० |
| २.७ | **वयोवृद्ध लोकांचे कल्याण**: समस्या व प्रश्न – शासकीय धोरण – कल्याण योजना व कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका आणि वयोवृद्धांच्या विकासासाठी सामूहिक सहभाग, विकासविषयक कार्यक्रमामध्ये त्यांच्या सेवांचे उपयोजन. | ३१३ |
| २.८ | **कामगार कल्याण** : समस्या व प्रश्न (कामाची स्थिती, मजुरी, आरोग्य आणि संघटित व असंघटित क्षेत्रांशी संबंधित समस्या)– शासकीय धोरण, कल्याण योजना व कार्यक्रम – आंतरराष्ट्रीय संस्था, समाज व स्वयंसेवी संघटना. | ३२६ |
| २.९ | **विकलांग व्यक्तिंचे कल्याण** : समस्या व प्रश्न (शैक्षणिक व रोजगार संधी यामधील असमानता इत्यादी)– शासकीय धोरण, कल्याण योजना व कार्यक्रम – रोजगार व पुनर्वसन यामधील आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका. | ३३७ |
| २.१० | **लोकांचे पुनर्वसन (विकास प्रकल्प व नैसर्गिक आपत्ती यांमुळे बाधित लोक)** : कार्यतंत्र धोरण व कार्यक्रम – कायदेविषयक तरतुदी – आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, मानसशास्त्रीय इत्यादीसारख्या निरनिराळया पैलूंचा विचार. | ३४९ |
| २.११ | **आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटना** : संयुक्त राष्ट्रे, आणि तिची विशेषीकृत अभिकरणे – युएनसीटीएडी, युएनडीपी, आयसीजे, आयएलओ, युनिसेफ, युनेस्को, युएनसीएचआर, इयु, ॲपेक, एशियन, ओपेक, ओएयु, सार्क, नाम, राष्ट्रकुल राष्ट्रे (कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स) आणि युरोपियन युनिअन. | ३५८ |
| २.१२ | **ग्राहक संरक्षण** : विद्यमान अधिनियमानची ठळक वैशिष्ट्ये – ग्राहकांचे हक्क – ग्राहक विवाद व निवारण यंत्रणा, मंचाचे निरनिराळे प्रकार – उद्दिष्ट्ये, अधिकार, कार्य, कार्यपद्धती, ग्राहक कल्याण निधी. | ३८८ |
| २.१३ | **मूल्ये व नीतितत्त्वे** : कुटुंब, धर्म, शिक्षण, प्रसारमाध्यमे इत्यादी यांसारख्या औपचारिक व अनौपचारिक संस्थांमार्फत सामाजिक मानके, मूल्ये, नीतितत्त्वे यांची जोपासना करणे. | ३९८ |

# विश्लेषण तक्ता

## विचारलेल्या प्रश्नांची संख्या

| अभ्यासक्रम | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **मानव संसाधन विकास** | | | | | | | |
| १.१ | १७ | २३ | २७ | १८ | १८ | २७ | २० |
| १.२ | २९ | २५ | २१ | २० | ३० | २४ | २१ |
| १.३ | ३ | ४ | ३ | २ | ४ | ९ | ८ |
| १.४ | ११ | ८ | ११ | १८ | ८ | ८ | १० |
| १.५ | ६ | १३ | १२ | ७ | १२ | ६ | १० |
| **मानवी हक्क** | | | | | | | |
| २.१ | १६ | १० | १० | ९ | ९ | १४ | ११ |
| २.२ | ५ | ६ | ८ | १० | ३ | ४ | ७ |
| २.३ | १० | १० | ९ | ८ | ८ | ७ | ८ |
| २.४ | ८ | ६ | ४ | ३ | ६ | ६ | ६ |
| २.५ | ३ | ५ | ४ | ५ | ४ | ८ | ३ |
| २.६ | ८ | ७ | २ | ८ | ४ | ४ | ७ |
| २.७ | ५ | ३ | ५ | ८ | ६ | – | ८ |
| २.८ | ६ | ७ | ६ | ६ | ३ | ४ | ३ |
| २.९ | ४ | ४ | ५ | ६ | ७ | ६ | २ |
| २.१० | ३ | ३ | ३ | १ | ४ | ५ | ६ |
| २.११ | ८ | ११ | १३ | १४ | १७ | ८ | ११ |
| २.१२ | ५ | ३ | ५ | ५ | ५ | ५ | ६ |
| २.१३ | २ | ३ | २ | ३ | ४ | २ | २ |

# सामान्य अध्ययन- ३

## १. मानव संसाधन विभाग

**: अभ्यासक्रम :**

**१.१ भारतातील मानव संसाधन विकास** : भारतातील लोकसंख्येची सद्यःस्थिती – संख्यात्मक स्वरूप (आकारमान आणि वाढ – लिंग, वय, नागरी आणि ग्रामीण) आणि गुणात्मक स्वरूप (शिक्षण व आरोग्य विषयक काळजी), लोकसंख्याविषयक धोरण आणि २०५० पर्यंतच्या योजना, आधुनिक समाजातील मानव संसाधन नियोजनाचे महत्त्व आणि गरज, मानव संसाधन नियोजनामध्ये अंतर्भूत असलेले घटक आणि कारणीभूत गोष्टी, भारतातील बेरोजगाराचे स्वरूप, प्रकार आणि समस्या, भारतातील सेवायोजनाचा कल, विभिन्न विभागांतील व क्षेत्रातील कुशल कामगारांचे मागणी दर, मनुष्यबळ विकासाकरिता कार्यरत असलेल्या शासकीय आणि स्वयंसेवी संघटना उदाः एनसीईआरटी, एनआयईपीए, विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी), मुक्त विद्यापीठे, एआयसीटीई, एनसीटीई, आयटीआय, एनसीव्हीटी, आयएमसी इत्यादी, मानव संसाधन विकासाशी संबंधित समस्या आणि बाबी, शासनाचे नोकरीविषयक धोरण, बेरोजगारी आणि न्यून बेरोजगारी कमी करण्यासाठी विविध योजना.

## २०१२

**७. २०११ च्या जनगणनेचे घोषवाक्य कोणते ?**

१) लोकाभिमुख
२) आपली जनगणना, आपले भवितव्य
३) शिक्षणभिमुख
४) समुदायाभिमुख

**उत्तर : २ –आपली जनगणना, आपले भवितव्य**

**स्पष्टीकरण –**२०११ ची जनगणना (अंतिम आकडे) (काही ठळक वैशिष्ट्ये)

१.भारताची २०११ मधील लोकसंख्या १२१, ०८,५४,९७७ झाली आहे. यापैकी ५१.५% पुरुष व ४८.५% स्त्रिया आहेत.

२.२००१ ते २०११ या दशकात लोकसंख्या १७.७% ने वाढली.

३.लोकसंख्येची घनता ३८२ झाली आहे.

४. लिंगगुणोत्तर ९४३ व ० ते ६ वर्षे वयोगटातील लिंगगुणोत्तर ९१८ झाले आहे.

५. प्रौढ साक्षरता ७२.९८% झाली आहे.

६. भारताची लोकसंख्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या २०१६ मधील तिसऱ्या ते सातव्या क्रमांकाच्या देशांच्या (अमेरिका, इंडोनेशिया, ब्राझील, पाकिस्तान, नायजेरिया) एकत्रित लोकसंख्येपेक्षासुद्धा जास्त आहेत.

**१०. 'राष्ट्रीय लोकसंख्या धोरण (NPP), समिती प्रमुख म्हणून ....... यांची निवड झाली ?**

१) डॉ. करुणाकरण
२) डॉ. एम. एस. स्वामीनाथन्
३) डॉ. अहलुवालिया
४) अनिल अगरवाल

**उत्तरः २ – डॉ. एम. एस. स्वामिनाथन**

**स्पष्टीकरण –** १. १९९१ मधील जनगणनेची आकडेवारी बाहेर आल्यानंतर त्यावर उपाय म्हणून १९९२ मध्ये श्री. करूणाकरण यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने नवीन लोकसंख्या धोरण जाहीर करण्याची शिफारस केली. शासनाने फक्त धोरणात्मक घोषणा न करता तिच्या अंमलबजावणीसाठी धोरणात्मक कार्यक्रम राबविण्याचा सल्ला या समितीने दिला.

**११. ………… यांनी देशातील बेकारीचे मूळ कारण लोकसंख्या वृध्दी हे जाणून बेकारी वरील प्रतिबंधक उपाय म्हणून संततिनियमनाचा पुरस्कार करण्याचे आवाहन केले होते ?**

१) डॉ. बी. आर. आंबेडकर २) र. धों. कर्वे ३) म. फुले ४) म. गांधी

**उत्तर: १ – डॉ. बी. आर. आंबेडकर**

**१८. २०११ जनगणनेच्या आधारे भारतात सर्वात जास्त लोकवस्ती असलेल्या असलेल्या जिल्हाचे नाव काय ?**

१) दिंडिगुल २) २४ परगणा ३) दरभंगा ४) ठाणे

**उत्तर : ४ – ठाणे**

**स्पष्टीकरण –** २०११ च्या जनगणनेनुसार भारतात सर्वांत जास्त लोकवस्ती असलेला पहिला जिल्हा महाराष्ट्रातील ठाणे जिल्हा आहे, तर दुसऱ्या क्रमांकावर पश्चिम बंगालमधील २४ परगणा हा जिल्हा आहे. भारतात सर्वांत कमी लोकवस्ती अरूणाचल प्रदेशमधील अनजाऊ जिल्ह्यात आहे.

**१९. भारताला लोकसंख्येसंदर्भात होणारा फायदा कशामुळे होत आहे ?**

**अ) जनन दरात घट ब) सरासरी आयुमानात सुधारणा क) दारिद्र्याच्या स्तरामधे घट**

**योग्य पर्याय निवडा :**

१) फक्त अ २) अ आणि क ३) अ आणि ब ४) अ, ब आणि क

**उत्तर : ३ – अ आणि ब**

**स्पष्टीकरण –** भारत हा एक तरूण लोकसंख्येचा देश आहे; कारण बहुसंख्य भारतीय तरूण आहेत. भारताचे सरासरी वय सुद्धा इतर अनेक देशांच्या तुलनेत कमी आहे. भारताचे मध्यक वय (Median age) २००१ मध्ये २२ वर्षे होते, ते २०११ मध्ये सुमारे २४ वर्षे इतके झाले आहे.

- ०–१४ या वयोगटातील (बालक वर्ग) लोकसंख्येचे प्रमाण १९७९ मधील ४२% या सर्वोच्च स्तरावरून २०११ मध्ये ३०.८% पर्यंत घसरले आहे. घसरत असलेल्या जन्मदराचे ते प्रतीक आहे.

**२२. भारतातील अर्धरोजगारी चे कारण कोणते ?**

१) विशेष पात्रता आणि व्यावसायिक कौशल्याची गरज २) अनैच्छिक अर्धवेळ काम

३) गरजेपेक्षा जास्त कामगार भरणा ४) वरील सर्व

**उत्तर: ४ – वरील सर्व**

**स्पष्टीकरण –** कमी प्रतीची बेरोजगारी (Underemployment) : ज्यावेळी एखाद्या व्यक्तीला आपल्या क्षमतेपेक्षा/कार्यक्षमतेपेक्षा/ शिक्षणाच्या दर्जापेक्षा कमी प्रतीच्या रोजगारावर समाधान मानावे लागते, त्यावेळी तिला कमी प्रतीची बेरोजगारी असे म्हणतात.

**उदा :** एखाद्या इंजिनिअरला क्लार्कची नोकरी करावी लागणे.

२३. **भारतात काम करू शकणाऱ्या वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण खालील कारणांमुळे वाढेल :**

**अ) सरासरी आयुर्मान कमी होईल.** **ब) अधिक संख्येने उद्योगधंदे सुरू होतील**

**क) जन्मदर घटता राहील.** **ड) अधिक संख्येने लोक जास्त काळ जगतील.**

**योग्य पर्याय निवडा :**

१) ब, क आणि ड २) अ आणि ब ३) फक्त क ४) फक्त ड

**उत्तर : ३ – फक्त क**

३०. **खालीलपैकी कोणत्या आशियाई देशांचे सरासरी आयुर्मान भारतापेक्षा जास्त आहे ?**

**अ) चीन** **ब) बांग्लादेश** **क) श्रीलंका** **ड ) भूतान नेपाळ**

**योग्य पर्याय निवडा :**

१) ब, क आणि ड २) ब आणि इ ३) अ, ड आणि इ ४) अ आणि क

**उत्तर: ४ – अ आणि क**

३२. **जर BRIC देशांचे नावे (ब्राझील, रशिया, भारत आणि चीन) त्यांच्या मानव विकास निर्देशांकातील स्थानानुसार (वरच्या स्थानापासून खालच्या स्थानापर्यत) रचायची झाली, तर खालीलपैकी कोणता पर्याय योग्य आहे ?**

१) RBCI २) BRCI ३) CRBI ४) RCBI

**उत्तर : १ – RBCI**

**स्पष्टीकरण –** HDR - २०१३ च्या अहवालानुसार BRIC राष्ट्रांपैकी रशियाने ५७ वा, ब्राझीलने ७९ वा, चीनने ९१ वा तर भारताने १३५ वा क्रमांक मिळवला.

३३. **राष्ट्रीय लोकसंख्या धोरण, २००० नुसार, कोणत्या वर्षापर्यंत लोकसंख्या स्थिरीकरणाचे उद्दिष्ट साध्य होईल ?**

१) २०३५ २) २०४५ ३) २०५५ ४) २०५०

**उत्तर : २ – २०४५**

**स्पष्टीकरण –** a) २००० मधील लोकसंख्या धोरणाचे तातडीचे (Immediate) उद्दीष्ट 'संतती नियमन, आरोग्य पायाभूत सुविधा व आरोग्यसेवकांची गरज भागविणे आणि प्रजनन व बालआरोग्य सेवा मिळण्यासाठी एकात्मिक सेवा पुरविणे' हे होते.

b) या धोरणांचे मध्यावधी (Medium term) उद्दिष्ट '२०१० पर्यंत एकूण जननदर (Total fertility rate) पुनःस्थापनेच्या स्तरावर (Replacement Level) आणणे व यासाठी धोरणात्मक अंमलबजावणी करणे' हे होते. जननदर पुनःस्थापनेच्या स्तरावर आणणे म्हणजे जननदर २.१ वर आणणे. म्हणजे एका जोडप्यामागे दोन मुले (हम दो, हमारे दो) या तत्त्वाचा प्रसार करणे व तशी अवस्था २०१० पर्यंत प्राप्त करणे.

c) या धोरणाचे दीर्घकालीन उद्दिष्ट (Long-term) '२०४५ पर्यंत लोकसंख्या स्थिरीकरण करणे व ती अशा स्तरावर स्थिर करणे, जिथे शाश्वत आर्थिक वाढ व सामाजिक विकास होईल आणि पर्यावरण सुरक्षित राहील.'

३४. **लोकसंख्या अंदाज अहवाल २००१ नुसार, खालीलपैकी कोणत्या राज्यामधील लिंगगुणोत्तर, २००१ च्या तुलनेत २०२६ मधे चांगले राहील ?**

१) गुजरात २) बिहार ३) राजस्थान ४) पंजाब

**उत्तर : २ – बिहार**

**स्पष्टीकरण –** लोकसंख्या अंदाज अहवाल २००१ नुसार २०२६ साली बिहारचे लिंग गुणोत्तर ९४९ असेल. तसेच राजस्थान, गुजरात व पंजाबचे अनुक्रमे ९१५, ८८२ व ८३९ याप्रमाणे असेल.

३५. **२०११ च्या जनगणनेतील आकडेवारी अनुसार भारतातील शहरीकरणाचे प्रमाण त्यापूर्वीच्या गणनेशी तुलना करता**

१) घटले आहे    २) मागच्या इतकेच आहे    ३) थोडेसे वाढले आहे    ४)लक्षणीयरित्या घटले आहे

**उत्तर : ३ – थोडेसे वाढले आहे.**

**स्पष्टीकरण –** १९०१ ते २०११ दरम्यान नागरी लोकसंख्या सुमारे १५ पटीने वाढली, तर सरासरी वाढीचा दर १२७.२७% प्रति दशक होता. १९३१ पर्यंत नागरी लोकसंख्येच्या वाढीचा दर कमी होता. त्यानंतर तो वेगाने वाढत जाऊन १९८१ साली सर्वोच्च म्हणजे ४६% च्या स्तरावर पोहोचला. त्यानंतर मात्र नागरीकरणाचा दर कमी होत आहे.

३९. **४.२ अब्ज लोकसंख्येसह आशिया हा सर्वात दाट मनुष्यवस्ती असलेला खंड आहे. ही आशियायी लोक एकूण जागतिक लोकसंख्येच्या किती टक्के आहे ?**

१) ५१%    २) ६०%    ३) ७०%    ४) ८०%

**उत्तर : २ – ६०%**

**स्पष्टीकरण –** १. सध्या जगाची लोकसंख्या प्रति वर्ष १.१४ टक्क्यांनी वाढत आहे. प्रति वर्ष सुमारे ८० दशलक्ष व्यक्तिंची भर पाडत आहे.

२. वार्षिक वाढीचा सर्वाधिक दर (२.१९ टक्के) १९६३ मध्ये होता. त्यानंतर तो कमी होत गेला. २०२० पर्यंत तो १ टक्क्यांहून कमी, तर २०५० पर्यंत तो ०.५ टक्क्यांहून कमी होण्याचा अंदाज आहे.

– जगाची सुमारे ६० टक्के लोकसंख्या आशियामध्ये, तर १५.५ टक्के आफ्रिकेमध्ये राहते.

४०. **२०११ साली संयुक्त राष्ट्रांच्या लोकसंख्या विभागाने २०५० सालातील जागतिक लोकसंख्येसंबंधी एक प्रस्तुत केला. यात संभाव्य सर्वाधिक लोकसंख्येच्या २० देशांची यादी दिली गेली. त्या यादीत पुढील कोणत्या देशाचा समावेश नाही ?**

१) व्हिएतनाम    २) पाकिस्तान    ३) ब्राझिल    ४) इंग्लंड

**उत्तर : ४ – इंग्लड**

**स्पष्टीकरण–** संयुक्त राष्ट्राच्या अंदाजानुसार, जगाची लोकसंख्या २०६२ नंतर सुमारे १० अब्ज च्या आसपास स्थिर होईल.

– २०३० च्या सुमारास भारताची लोकसंख्या चीनपेक्षा अधिक बनेल, तर २०४५ मध्ये नायजेरिया युएसए ला मागे टाकून तिसऱ्या क्रमांकावर येईल.

४४. **उंची, गोरेपणा, उंच कपाळ, लांब व धारदार नाक ही वांशिक ठेवण कोणत्या वंश समूहाशी निगडीत आहे ?**

१) नेग्रिटोस    २) द्रविड    ३) इण्डो–आर्यन्स    ४) प्रोटो–ऑस्ट्रालॉइड्स

**उत्तर : ३ – इन्डो–आर्यन्स**

५२. **२०११ सालच्या जनगणनेतील आकडेनुसार खालीलपैकी कोणते विधान चुकीचे नमूद केले आहे ?**

१) २००१ च्या तुलनेत २०११ साली देशातील ग्रामीण कुटुंबांकडे असणारी दूरदर्शन संचांची संख्या १८.९% वरुन ३३.४% पर्यत वाढली आहे.

२) २०११ साली ग्रामीण घरामध्ये असणारी टेलीफोन्सची एकूण संख्या ५४.३% आहे.

३) २०११ च्या जनगणनेनुसार देशातील एकूण कुटुंबांची संख्या ३०.५ कोटी आहे.

४) २०११ च्या जनगणनेनुसार देशात ७०.६% नागरी कुटुंबाकडे नळामार्फत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे. तर केवळ ३०.८% ग्रामीण कुटुंबांकडेच अशी व्यवस्था आहे.

**उत्तर : ३ – २०११ च्या जनगणनेनुसार देशातील एकूण कुटुंबाची संख्या ३०.५ कोटी आहे.**

**स्पष्टीकरण –** कुटुंबे (Households) आणि कुटुंब सुविधा (Household Amenities)